## सर्व तारूनी तो नेई माझा सद्‌गुरु अनिरुध्द!

*– साक्षीवीरा बेनखळे, मस्कत*

---

परका देश, परकी लोकं आणि परकी भाषा. अशा परिस्थितीत ह्या श्रद्धावान कुटुंबावर एक असा प्रसंग येतो की जिथे सर्व मार्ग बंद झालेले दिसू लागतात. पावणे दोन वर्षांची पोटची पोर अक्षरश: मरणाच्या दारात उभी राहिल्यागत परिस्थिती निर्माण होते. पण अशावेळी सद्‌गुरुकृपेला कुठला उशीर? पुढे जे घडते ते सर्वच अघटित असेच...

---

हरि ॐ. १९९८ मध्ये आम्ही बापू परिवारात सहभागी झालो. माझे मिस्टर नेस्ले कंपनीमध्ये काम करतात आणि लग्न झाल्यापासून आम्ही मस्कतलाच आहोत. मी इथे माझ्या पावणे दोन वर्षाच्या मुलीचा, मृणमयीचा अनुभव सर्वांना सांगणार आहे. साईबाबांनी देहात असताना दिलेली ग्वाही मला इथे आठवली जी आम्ही साक्षात अनुभवली आहे.

मज न लागे गाडी घोडी ।
विमान अथवा अगीनगाडी ।
हाक मारी जो अवलंबी ।
प्रगटे मी ते घडी अवलंबी ।।

माझे आई वडील डिसेंबर २०११ साली पहिल्यांदाच मस्कतला आले होते. आई नोकरी करते आणि वडिल निवृत्त झाले आहेत. आईला फक्त एक महिन्याची सुट्टी मिळाली असल्याने ते दोघेही एका महिन्यातच पुन्हा भारतात जाणार होते. २० जानेवारीला त्यांचं रात्रीचं दीडचं विमान होतं. आम्ही त्यांना विमानतळावर सोडायला जाणारच होतो. त्या दिवशी नेमका शुक्रवार होता आणि दर शुक्रवारी आम्ही तेथील उपासना केंद्रात अशुभनाशिनी स्तवनम्‌ व शुभंकरा स्तवनम्‌चा २७ वेळा पाठ करायचो.

आम्ही मस्कत पासून १३४ कि.मी. वर सुवेट ह्या गावी होतो. मस्कत ते सुवेटचा प्रवास दीड तासाचा आहे. आई बाबांची काही खरेदीही बाकी असल्याने आम्ही गाडीमध्येच सर्वांनी एकत्र उपासना करुन कार्यप्रमुखांच्या घरी फक्त बापूंचे दर्शन घ्यायचे ठरवले. पण आम्हाला त्यांच्या घरी जायला उशीर झाला आणि ते शुक्रवारची उपासना झाल्यावर घर बंद करून बाहेर गेले होते. बापूंचे दर्शन न झाल्याने मी जरा निराश झाले.

मला दिलासा देत माझे मिस्टर म्हणाले, ''बापू सगळीकडे असतात. तू बाहेरुन पाया पडलीस तरी तो नमस्कार बापूंना पोहोचणारच आहे. ते आपल्या बरोबर इथेही आहेतच''. बाहेरुनच बापूंना नमस्कार करुन आम्ही मॉलमध्ये खरेदीला निघालो व तेथून विमानतळावर गेलो. आम्ही दोघेही मुलीसोबत त्यांना सोडायला आतपर्यंत गेलो. माझ्या मुलीला माझ्या आई बाबांचा लळा लागला होता. तिला आजी आजोबांसोबत अजून जरा वेळ काढता यावा म्हणून आम्ही त्यांच्याशी गप्पा मारत तिथेच थांबलो. शेवटी माझ्या आईच्याच सांगण्यावरुन रात्री एक वाजता आम्ही परत घरी जायला निघालो. त्यावेळी मृणमयी खूपच रडली. त्यांना सोडायलाच तयार होत नव्हती. तिला शांत करायच्या हेतूने मी तिला तिथल्या सेक्युरिटीची भिती घातली. हे पोलिस आहेत असे सांगितल्यावर ती बिचारी घाबरुन शांत झाली.

परतीच्या प्रवासात गाडीमध्ये मृणमयी तिला दिलेला खाऊ खात होती आणि गाडीत सर्वत्र नाचत होती. मुलगी सर्व काही विसरली असेल ह्या भ्रमात आम्ही होतो. ती फक्त पावणे दोन वर्षाचीच असल्याने, मला दुध हवे असे तिने खुणावले व ते पिऊन ती लगेचच झोपली.

विमानतळापासून आम्ही फक्त ८ किलोमिटर अंतर गेलो होतो आणि अचानक झोपलेली मृणमयी घाबरुन उठली. तिने स्वप्नात काहीतरी बघितले असेल म्हणून ती घाबरुन उठली असे मला सुरुवातीला वाटले. मी तिला थोपटून 'बाळा झोप हं' असे म्हटले. ह्यानंतर तिने घाबरुन माझ्याकडे मोठे डोळे करुन पाहिले. माझ्या काळजात धस्स झाले आणि मी मनात म्हटले, 'अरे बापरे, ही असे मोठे डोळे करुन का बघते कोण जाणे'. काही बोलणार इतक्यात तिचे डोळे वर गेले व ती अंग ताट करायला लागली. ती तापाने फणफणली होती. तिच्याकडे बघून मी खूपच घाबरले व मिस्टरांना सांगितले की मृणमयीने डोळे फिरवले आहेत. पण त्यांना वाटले की ती झोपेतच असेल. पण मी त्यांना म्हटले हे काहीतरी वेगळेच आहे. ती झोपली नव्हतीच. मृणमयी काहीच प्रतिसाद देत नसल्याने मी खूप अस्वस्थ होते. मस्कतला गाडी लगेच थांबवणे कठीण असते. तरीही मिस्टरांनी गाडी एका बाजूला थांबवली. लहान मुलगी सोबत असल्याने व लांबचा प्रवास असल्याने आम्ही गरम व थंड पाण्याच्या बाटल्या व खाणे नेहमी बरोबर ठेवायचो.

तिला आकडी येत आहे म्हणून मिस्टरांनी तिच्यावर थंड पाण्याची दीड लिटरची बाटली ओतली. डॉक्टरांनी मागे आम्हाला सांगितले होते की हिला ताप आला, तर थंड पाण्याचा मारा करा. मी तिची पाठ व छाती चोळली पण तिच्याकडून काहीच प्रतिसाद नव्हता. मृणमयीची हालचाल पूर्ण बंद झाली हाती. मला तेव्हा वाटले की माझी मुलगी आता गेली. मी तिथेच जोरजोरात रडायला लागले.

मस्कतला ओमानी लोक आहेत व ते अरबीच बोलतात. त्यांना मराठी भाषा समजत नाही. मी तिथे जोरजोरात ओरडत होती की कोणीतरी मदतीला या, माझी मुलगी गेली. पण हायवेला रात्री दीड वाजता कोण येणार होते? त्यातून परका देश, परकी माणसे! मिस्टर म्हणाले की आपण हिला रुग्णालयात घेऊन जाऊ. म्हणून आम्ही पुन्हा लगबगीने गाडीत बसलो व घोरकष्टोद्धरण स्तोत्र म्हणायला सुरुवात केली.

आम्ही किती वेळा स्तोत्र म्हटले असेल ते बापूंनाच माहित. पण हे स्तोत्र म्हटल्यावर आम्ही गाडी परत स्टार्ट करणार इतक्यात आमच्याच गाडीच्या समोरुन एक पांढऱ्या रंगाची गाडी रिवर्समध्ये मागे आली. ती गाडी माझ्या बाजूला कधी येऊन थांबली हे आम्हाला कळलेच नाही. कुठून आली हे ही माहित नाही. त्या रस्त्यावर मी आधी सांगितल्याप्रमाणे एकही गाडी नव्हती. मस्कतला लेफ्ट हॅन्ड ड्राइव्ह आहे. गाडी माझ्या बाजूला थांबताच त्या गाडीतून एक कंदुरा घातलेला, म्हणजे ओबामी लोकांचा गणवेश घातलेला माणूस उतरला. अगदी जुना परिचय असल्यास–ारखे आम्ही समोरासमोर होतो. त्या ओबामी माणसाने मृणमयीला माझ्या हातून मागितले. मी सुध्दा त्या माणसाची ओळख असल्याच्या सहज भावाने तिला त्याच्याकडे देऊनही टाकले. तो माणूस मला सांगत होता, ''मी दत्त आहे, मी दत्त आहे''. असे एकदाच नाही तर मी ते दोन वेळा ऐकले. जे काय घडत होते ते माझ्या आकलनाच्या शक्तीच्या पलिकडचे होते. माझी मुलगी निपचित, काहीच चेतना नसल्याप्रमाणे पडली होती व हा माणूस कुठून आला, कसा आला, काहीच कळत नव्हते. मी पूर्ती भांबावलेल्या स्थितीत होते. राहून राहून हाच विचार माझ्या मनात येत होता की हा ओमानी माणूस मराठीत 'मी दत्त आहे' असं कसं बोलू शकतो?

मला काहीही कळत नव्हते. काहीही सुचत नव्हते. ह्यानंतर सर्वात मोठी गोष्ट अशी झाली की माझ्या हातातील निष्प्राण झालेली माझी मुलगी त्याच्या हातात गेल्यावर हालचाल करायला लागली व डोळे उघडून सर्वत्र बघायला लागली. मी तिथेच त्यांना म्हटले, ''माझी मुलगी तुमच्या हातात गेल्यावर जिवंत झाली''. ह्यानंतर तो माणूस मला म्हणाला (हे मी नीट ऐकलं होतं), ''मी डॉक्टर आहे. आय ॲम अ डॉक्टर'' आणि नंतर त्याने

म्हटले, ''युअर बेबी इज फाइन. डोन्ट टेक टेन्शन, शी इज फाइन'' (तुमची मुलगी आता बरी आहे, तेव्हा तुम्ही काहीच काळजी करू नका). त्यांनी मला मृणमयीला रुग्णालयात घेऊन जायला सांगितले. माझे मिस्टर उतरुन त्याच्या जवळ जाऊन उभे राहिले. त्या ओबामी माणसाने नुसते वळून त्यांच्याकडे पाहिले व जे वाक्य त्याने मला इंग्रजीमध्ये सांगितलं, ते मिस्टरांना पुन्हा मराठीत ऐकू आलं. जे काही घडले ते अघटीत होते, विचारांच्या पलिकडले होते. आम्ही दोघंही सुन्न झालो होतो.

आम्हा दोघांनाही कळून चुकले होते की हे बापूंनीच घडवून आणले होते. त्या आनंदाच्या भरात तो माणूस कोण आहे, कुठे असतो, कुठे जाणार आहे, हे काहीच त्याला विचारले नाही. ह्यानंतर त्या माणसाने पोलिसांच्या एका गाडीला थांबवले आणि त्यांना सांगितले, ''हे खूप बाव-चळलेले आहेत आणि ह्यांना टेन्शन आले आहे. तेव्हा तुम्ही ह्यांना रुग्णालयाचा पत्ता द्या''. आम्ही पत्ता घेतला खरा, पण पावसामुळे रस्ते खराब होते व खूपच डायवर्जन्स असल्याने आम्हाला काही त्या रुग्णालयाचा मार्ग सापडेना.

मुलगी शुध्दीत आल्याच्या आनंदात तर आम्ही होतोच, पण त्याच क्षणाला आमच्या मनात फक्त एकच विचार होता की ज्या अर्थी त्या माणसाने 'मुलीला रुग्णालयात न्या' असे सांगितले आहे, तेव्हा आम्ही तिला तिथे नेलेच पाहिजे. पुढच्या प्रवासात त्या मदत केलेल्या माणसाची गाडी आम्हाला दिसत होती, पण जरा वेळाने वळून बघितल्यावर तीही दिसेनाशी झाली. जशी ती गाडी कुठून आली हे कळले नाही, तशीच ती कुठे गेली हेही कळले नाही. आम्ही पुढे गेल्यावर एक रुग्णालय दिसले पण ते बंद होते. मृणमयी अजून ग्लानीतच होती व ती सारखे डोळे बंद करत होती.

पण मिस्टरांनी त्याच दिवशी सकाळी एका मॉलच्या बाजूला एक नवीन रुग्णालय बघितले होते. ह्याचा फायदा आम्हाला रात्री झाला. अचानक त्यांना ते रुग्णालय आठवले व आम्ही तिथे गेलो. संकटकालीन व्यवस्था बापूंनी आधीच करुन ठेवली होती. पावणे दोन ते दोनच्या सुमारास आम्ही त्या रुग्णालयात गेलो. मृणमयीला इमर्जन्सी वॉर्डला दाखल करण्यात आले. तिथे भराभर यंत्रणे लावून तिचा बी.पी., पल्स पासून सगळ्या चाचण्या करण्यात आल्या. कोणालाही विश्वास बसणार नाही, पण सगळे रिपोर्टस् अगदी नॉर्मल आले. तिचा तापही उतरला होता.

हे त्रिवार सत्य आहे आणि मी विश्वासाने सांगते की बापूंनीच आपल्या भक्ताला कृतान्ताच्या दाढेतून बाहेर काढण्यासाठी साता समुद्रापलिकडेही ही सर्व यंत्रणा उभी केली होती.

हरि ॐ श्रीराम अंबज्ञ

नाथसंविध्